८५१-२
२६/१०/१८

महाराष्ट्र शासन

क्रमांक :-संकीर्ण-२०१८/प्र. क्र. ३११/विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक: २५ ऑक्टोबर, २०१८.

प्रति,

१. कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.
२. संचालक,
उच्च शिक्षण,
पुणे.

विषय :- विधानमंडळाचे कामकाज हाताळण्यासाठी विद्यापीठातील/ संचालक, उच्च शिक्षण कार्यालयातील जबाबदार अधिकारी/ कर्मचा-यांची नियुक्ती करण्याबाबत...

महोदय,

महाराष्ट्र विधानमंडळाचे तिसरे (हिवाळी) अधिवेशन दिनांक १९ नोव्हेंबर, २०१८ पासुन सुरु होत आहे. सदर अधिवेशनात सन्माननीय विधानमंडळ सदस्य विविध आयुधांद्वारे उदा. तारांकित प्रश्न, अतारांकित प्रश्न, लक्षवेधी सुचना, औचित्याचा मुद्दा इ. मुद्दे उपस्थित करत असतात. सन्माननीय विधानमंडळ सदस्यांनी उपस्थित केलेल्या विविध मुद्दयांच्या अनुषंगाने त्वरित कार्यवाही करणे अपेक्षित असते.

त्यामुळे विधानमंडळाचे कामकाज हाताळण्यासाठी आपल्या विद्यापीठातील/ संचालक, उच्च शिक्षण कार्यालयातील जबाबदार अधिकारी/ कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात यावी व त्यांचे पदनाम, भ्रमनध्वनी क्रमांक याबाबतची माहिती दोन दिवसात शासनास उपलब्ध करुन द्यावी. तसेच सदर अधिकारी/ कर्मचा-यांना विधानमंडळाशी संबंधित संदर्भ शासनाकडुन प्राप्त होताच त्या संदर्भावर त्याच दिवशी किंवा जास्तीतजास्त दुस-या दिवशी दुपारपर्यंत शासनास माहिती उपलब्ध करुन देण्याविषयी आपल्या स्तरावरुन निर्देश देण्यात यावेत.

तसेच, महाराष्ट्र विधानमंडळाशी संबंधित असलेले जे कामकाज आपल्याकडे प्रलंबित आहे, त्याचा शासनाशी संपर्क साधुन दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८ पर्यंत निपटारा करण्यात यावा. या कालावधीत प्रलंबित असलेल्या कामकाजाचा निपटारा न झाल्यास त्यास जे जबाबदार असतील त्या अधिकारी/ कर्मचा-यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, व त्याप्रमाणे शासनास अवगत करण्यात यावे.

(नि. अ. पांढरकामे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीकरिता :-
सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक

Estd. 1962
NAAC "A" Grade

## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### परिपत्रक

वरील प्रमाणे मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि.२५/१०/२०१८ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र विधान मंडळाचे (हिवाळी) अधिवेशन दि.१९/११/२०१८ पासून सरू होत आहे. यास्तव अधिवेशनाच्या कामकाजाच्या अनुषंगाने विद्यापीठाशी संबंधित माहिती शासनास तात्काळ उपलब्ध करून देण्यासाठी **समन्वयक अधिकारी म्हणून श्री.व्ही.एस.सोयम, उपकुलसचिव आस्थापना विभाग यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**

महाराष्ट्र विधानमंडळाशी संबंधित असलेले जे कामकाज आपल्या विभागाकडे प्रलंबित आहे, त्याचा शासनाशी संपर्क साधुन दि.१५/११/२०१८ पर्यंत निपटारा करण्यात यावा. या कालावधीत प्रलंबित असलेल्या कामकाजाचा निपटारा न झाल्यास त्यास जे जबाबदार असतील त्या अधिकारी / कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात करून, त्याप्रमाणे शासनास अवगत करणेबाबत सूचित केले आहे. यास्तव आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या तारांकित / अतारांकित प्रश्नावर तात्काळ कार्यवाही करून, त्याची एक प्रत आस्थापना विभागास देण्यात यावी.

तरी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी कळविल्यानुसार विद्यापीठातील तारांकित / अतारांकित प्रश्नांची उत्तरे / पूरक टिपणी त्याच दिवशी सादर करण्यात यावेत. विधानमंडळ कामकाजाचे गांभीर्य पाहता कार्यालय सोडण्यापूर्वी संचालनालयाकडे / विभागीय सहसंचालक कार्यालयाकडे काही तातडीची माहिती आवश्यक आहे किंवा कसे याची खात्री करूनच सहायक कुलसचिव व अधीक्षक यांनी समन्वयक अधिकाऱ्यांची परवानगी घेवूनच कार्यालय सोडावे. संचालनालय / विभागीय सहसंचालक यांना देण्यात येणाऱ्या तारांकित / अतारांकित प्रश्नांच्या उत्तरांची छायांकित प्रत इकडील विभागास पाठविण्यात याव्यात. सदरचे परिपत्रक विभागातील सर्व अधिकारी / सेवकांच्या निदर्शनास आणावे.

कुलसचिव

जा.क्र. एसयुके/आस्थापना-२ / 2952

दिनांक :- 13 NOV 2018

प्रति,

१. सर्व अधिविभाग प्रमुख, संचालक, समन्वयक व सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहा.कुलसचिव व समकक्ष अधिकारी
३. संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्र ४. संचालक, विद्यार्थी कल्याण ५. सर्व रेक्टर्स

प्रत :- मा.कुलगुरू, मा.प्र-कुलगुरू, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय.